जा.क्र./उमाशि-२/शिमा/पुवि/२०१३ /२६६३८/४६
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १. यांचे कार्यालय,
दि :- 2 3 OCT 2013

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
माध्यमिक विद्यालय संलग्न उच्च माध्यमिक विद्यालये
वरिष्ठ महाविद्यालयांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालये
पुणे / सोलापूर / अहमदनगर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पट पडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता.

संदर्भ :- १) शासन पत्र क्रं. एचएससी-२०११/०१/११/उमाशि-१ दिनांक २६/५/२०११
२) शासन पत्र क्रं. एचएसएन १००७/(३६/०७)/माशि-२ दि. ६/२/२०१२
३) या कार्यालयाचे पत्र समक्रमांक २०७५९-७२ दिनांक २२/८/२०१३
४) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य मंडळ, यांचे क्रं. रा.म./परिक्षा-२/६१७२/ दिनांक १७/९/२०१३

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार शासनाने व तसेच एस.एस.सी /एच.एस.सी. बोर्डाने कळविल्यानुसार इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांच्या परीक्षा आवेदन पत्रासोबत संच मान्यता प्रत जोडणे अनिवार्य आहे.

त्याअनुषंगाने दिनांक २७/८/२०१३ ते १९/१०/२०१३ या कालावधीत प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मधील संच मान्यतेची ऑनलाईन भरलेली माहिती तपासून आपणास संच मान्यता, तक्ता अ व ब मधील मान्यता आदेश देण्याबाबत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे वेळापत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** संकेस्थळावर पसिध्द करण्यात आले होते. या वेळापत्रकानुसार तीनही जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयाचे कामकाज पूर्ण झालेले आहेत. काही कारणास्तव कनिष्ठ महाविद्यालयाची संच मान्यता कार्यभार निश्चिती पटपडताळणी झाली नसल्यास तसेच दिनांक ९, १० व ११ ऑक्टोंबर २०१३ रोजी संच मान्यता न झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयांनी दिनांक २८/१०/२०१३ रोजी रा. प. सबनीस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे येथे व दिनांक २९/१०/२०१३ रोजी जयहिंद हायस्कूल व ज्युनि कॉलेज, पिंपरी, पुणे येथे उपस्थित रहावयाचे आहे.

अनुदानीत, अंशतः अनुदानित, विना अनुदानीत, कायम विना अनुदानीत तत्वावरील मान्यता प्राप्त सर्व उच्च माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ची संच मान्यता झाल्याशिवाय बोर्डाचे परिक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

*मा. शिक्षण उपसंचालक यांच्या*
*मान्य टिपणीनुसार*

( बाळासाहेब ओव्हाळ )
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १ करिता

माहिती व कार्यवाहीसाठी :
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,
पुणे / सोलापूर / अहमदनगर
२. प्राचार्य, रा. प. सबनीस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे
३. प्राचार्य, जयहिंद हायस्कूल व ज्युनि कॉलेज, पिंपरी, पुणे
/- यांनी शिबिर कालावधीत आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.